# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.४२** **(स्थायी समिती)**

---

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २३९** **दिनांक :-२८/०२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.१३/०२/२०२५ गुरुवार रोजी दुपारी - १२.०० वाजता झालेली विशेष अर्थसंकल्पीय स्थायी समिती सभा क्र.४० व दि.१३/०२/२०२५ गुरुवार रोजी दुपारी - १२.३० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४१ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.१३/०२/२०२५ गुरुवार रोजी दुपारी - १२.०० वाजता झालेली विशेष अर्थसंकल्पीय स्थायी समिती सभा क्र.४० व दि.१३/०२/२०२५ गुरुवार रोजी दुपारी - १२.३० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४१ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.१३/०२/२०२५ गुरुवार रोजी दुपारी - १२.०० वाजता झालेली विशेष अर्थसंकल्पीय स्थायी समिती सभा क्र.४० व दि.१३/०२/२०२५ गुरुवार रोजी दुपारी - १२.३० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४१ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४२** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:- २४०** **दिनांक :-२८/०२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१९८३/२०२४-२५ दि.२१/०२/२०२५
३. निविदा समितीचा दि.११/०२/२०२५ चा निर्णय.

**विषय :-** लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्त्यात सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०१ मधील स.नं.३३१/१ दत्तात्रय नगर मधील ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सींग करणे व जॉगींग ट्रॅक करीता पेव्हींग ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा १५.७५०% कमीचे दरास मान्यता देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ व ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्त्यात सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०१ मधील स.नं.३३१/१ दत्तात्रय नगर मधील ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सींग करणे व जॉगींग ट्रॅक करीता पेव्हींग ब्लॉक बसविणे कामास जिल्हाधिकारी,जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नप/ समाजकल्याण/ ना.द.व.सु.यो./५९/२०२४ दि.२५/०९/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार एकत्रित ई निविदा प्रसिध्द करण्यास आयुक्त, मनपा यांचे दि.२७/०९/२०२४ च्या मान्यतेनूसार उक्त कामाची ई निविदा सुचना क्र.५३५ संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०४ मक्तेदारांच्या ई निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ मंत्रालय मुंबई दि.२७/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार तिन निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार आलेल्या ई-निविदांचे कागदपत्रांची छाननी केली असता त्यात एकच ई निविदा पात्र झाल्याने उक्त कामाची दुसऱ्या वेळेस ई निविदा प्रसिध्द करणेस आयुक्त यांनी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची दुसऱ्या वेळेस ई निविदा सुचना क्रं.५७३ संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०३ ई-निविदा संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सी एटी-२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ मंत्रालय,मुंबई दि.२७/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार तिन निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार आलेल्या ई-निविदांचे कागदपत्रांची छाननी केली असता निविदाधारक पंकज गजानन वाघ यांना अपात्र ठरविण्यात आले आहे व खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने प्राप्त ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.२८,२७,६१६/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | वासुदेव प्रभाकर पाटील | निविदा रक्कमेपेक्षा १५.७५०% कमीचे दराने | रु.२३,८२,२६६/- |
| २ | निखील कृष्णराज पाटील | निविदा रक्कमेइतकेचेच दराने | रु.२८,२७,६१६/- |

वरील तुलनात्मक तकत्यानूसार मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा १५.७५०% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.२३,८२,२६६/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | २३,८२,२६६/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | ४,२८,८०८/- |
| ०३ | कामगार विमा १% | २३,८२३/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | ९,४५०/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | ३८,७५९/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | २८,८३,१०६/- |

वर नमुद निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.२८,८३,१०६/- मात्र परंतु वासुदेव प्रभाकर पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा १५.७५०% कमीचे दर सर्वात कमी आलेले असुन निविदा अटी शर्ती नुसार त्यांच्या कडुन १% परफार्मन्स सिक्युरिटी अनामत रक्कम मनपा खजिन्यात भरणा करण्यासाठी मक्तेदार यांना पत्र क्रं.साबा/१८७८ दि.३०/०१/२०२५ अन्वये डि डी सादर करण्यास कळविले असता मक्तेदार यांनी मुदतीत मनपा पावती क्रं.७६९६ दि.०३/०२/२०२५ रोजी डि.डी. क्रं.००७०५६ रक्कम रु.२,३०,६४८/- मात्रचा जमा केलेला आहे. सदर कामी वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.२८,८३,१०६/- मात्र लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन करावा लागणार आहे. त्याअनुषंगाने मक्तेदार वासुदेव प्रभाकर पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा १५.७५०% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४२** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:- २४१** **दिनांक :-२८/०२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१९९५/२०२४-२५ दि.२४/०२/२०२५
३. निविदा समितीचा दि.०४/०२/२०२५ चा निर्णय.
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२६/०७/२०२४ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.२६/०७/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** Ncap योजने अंतर्गत प्रभाग क्र.०९ मधील पिंप्राळा शिवार गट नं.६/१, ६/२ तसेच इतर भागात रस्ते डांबरीकरण करणे.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

Ncap योजने अंतर्गत प्रभाग क्र.०९ मधील पिंप्राळा शिवार गट नं.६/१, ६/२ तसेच इतर भागात रस्ते डांबरीकरण करणे कामास आयुक्त, मनपा यांचे दि.२६/०७/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार उक्त कामाची प्रथम जाहीर निविदा सुचना क्र.५१८ मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ मक्तेदारांच्या ई निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या असून सदरचे आलेले बंद पाकीटापैकी लिफाफा नं.०१ उघडून त्याची विस्तृत छाननी केली असता मक्तेदार यांचे अपुर्ण कागदपत्राच्या आधारे अपात्र ठरविण्यात आले. त्यामुळे सदर कामाची दुसरी फेर निविदा जाहिर करणेस आयुक्त यांनी दि.२६/०७/२०२४ रोजी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची दुसऱ्या वेळेस ई निविदा सुचना क्रं.५६१ मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०४ ई-निविदा संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या असून अ.नं.०४ चे निविदाकार पात्र ठरत असुन अ.नं.०१ ते ०३ चे निविदाकार अपात्र ठरत आहे. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२७/०९/२०१८ मधील क्लॉज नं.४.३ मधील मुळ प्रारुप निविदेमध्ये कुठलाही बदल न केल्यास नवीन केलेली मागणी ही व्दितीय मागणी समजण्यात येईल अशा मागणीनंतर जर परत एकाकी निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांबाबत निविदा उघडून प्रचलित कार्यपध्दतीनुसार पूढील कार्यवाही करावी अशा निविदेबाबत पुन:श्च फेरनिविदा मागविण्याची आवश्यकता नाही म्हणुन खालील निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.७६,४८,८७२/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री.यशपाल दयाराम शर्मा | निविदा रक्कमेवर २३.९९०% कमीचे दर | रु.५८,१३,९०७/- |

वरील तुलनात्मक तकत्यानूसार मक्तेदार श्री.यशपाल दयाराम शर्मा यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर २३.९९०% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.५८,१३,९०७/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| अ.नं. | निविदा रक्कमेवर २३.९९०% कमी दरा प्रमाणे येणारा अपेक्षीत खर्च रक्कम | रु.५८,१३,९०७/- |
|---|---|---|
| ०१ | टेस्टींग चार्जेस | ७,८००/- |
| ०२ | रॉयल्टी | ८८,६४१/- |
| ०३ | जि.एस.टी. १८% | १०,४६,५०३/- |
| ०४ | कामगार विमा १% | ५८,१३९/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ७०,१४,९९०/- |

वर नमुद निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.७०,१४,९९०/- मात्र आहे. सदरचा खर्च राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रम या लेखाशिर्षकाखाली मंजुर झाले असल्याने सन-२०२४-२५ या वित्तीय वर्षात खर्च करावयाचा आहे. त्यानुसार मक्तेदार श्री.यशपाल दयाराम शर्मा यांचे निविदा रक्कमेवर २३.९९०% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४२** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०४** **प्रशासक ठराव क्र.:- २४२** **दिनांक :-२८/०२/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदा.

**विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१३६ दि.१३/०२/२०२५ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत प्रभाग क्रं.०९ मधील जेडीसीसी बँक कॉलनी नाका ते शरद देशमुख यांच्या घरापर्यंतचा रस्ता काँक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री.संदेश ज्ञानदेव टेकाडे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १७.९९% सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.४,१०,९३७/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१३७ दि.१३/०२/२०२५ अन्वये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत प्रभाग क्रं.१० अंतर्गत गट नं.२०४/१ श्री.शेळके ते मिलिंद पवार यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे कामी मक्तेदार हितेश रविंद बारी यांचे निविदा रक्कमेपेक्षा १८% सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.८,११,४१४/- मात्र खर्चाची संविदा.

३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१३८ दि.१३/०२/२०२५ अन्वये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत प्रभाग क्रं.१० अंतर्गत प्रदिप चौधरी ते अमृतकर बाबा यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे कामी मक्तेदार हितेश रविंद बारी यांचे निविदा रक्कमेपेक्षा १८% सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.८,२०,३११/- मात्र खर्चाची संविदा.

४. प्रशासकीय आदेश क्र.पा.पु./६३ दि.१७/०२/२०२५ अन्वये उमाळा जलशुध्दीकरण केंद्राची यांत्रिकी उपांगांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणे कामी मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे,जळगांव यांचे आलेले बाबवार दर सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.१९,३५,३७४/- चे खर्चाची संविदा.

उपरोक्त वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार संविदांची माहिती घेतली.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**